रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 1 ] नई दिल्ली, अप्रैल 21-27, 2016/1-7 वैशाख (शक) 1938 [खंड 17
No. 1 ] NEW DELHI, APRIL 21-27, 2016/1-7 VAISAKHA (SAKA) 1938 [Vol. 17
अं. १ ] नवी दिल्ली, एप्रिल २१-२७, २०१६/१-७ वैशाख (शके) १९३८ [खंड १७

स्वंतत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, अप्रैल 21-27, 2016/1-7 वैशाख (शक) 1938

(1) दि सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड एक्ट, 2008, (2) दि राईट ऑफ चिल्ड्रेन टू फ्री ॲन्ड कम्पलसरी एज्युकेशन एक्ट, 2009, (3) दि इंडियन फॉरेस्ट एक्ट, 1927, (4) दि कॅरिज बाय रोड एक्ट, 2007 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, APRIL 21-27, 2016/1-7 VAISAKHA (SAKA) 1938

The Translation in Marathi of (1) The Science and Engineering Research Board Act, 2008, (2) The Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, (3) The Indian Forest Act, 1927, (4) The Carriage by Road Act, 2007 are hereby published under

the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

### विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली, एप्रिल २१-२७, २०१६/१-७ वैशाख (शके) १९३८

पुढील अधिनियमांचे म्हणजे (१) दि सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड अॅक्ट, २००८, (२) दि राईट ऑफ चिल्ड्रेन टू फ्री अॅन्ड कम्पलसरी एज्युकेशन अॅक्ट, २००९, (३) दि इंडियन फॉरेस्ट अॅक्ट, १९२७, (४) दि कॅरिज बाय रोड अॅक्ट, २००७ या अधिनियमांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रसिद्ध करण्यात येत असून प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २, खंड (क) अन्वये हा अनुवाद त्या अधिनियमाचे प्राधिकृत पाठ आहेत असे समजले जाईल.

### निर्देशसूची

### INDEX


| अनुक्रमांक Serial No. (१) | अधिनियमाचे नाव Name of the Act (२) | पृष्ठ क्रमांक Page No. (३) |
| --- | --- | --- |
| १ | विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन मंडळ अधिनियम, २००८<br>The Science and Engineering Research Board Act, 2008 | ३ |
| २ | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९<br>The Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 | १० |
| ३ | भारतीय वन अधिनियम, १९२७<br>The Indian Forest Act, 1927 | २४ |
| ४ | रस्ते वाहतूक अधिनियम, २००७<br>The Carriage by Road Act, 2007 | ४५ |

# बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९

## २००९ चा अधिनियम क्रमांक ३५

(१४ ऑक्टोबर २०१५ रोजी यथाविद्यमान)

[२६ ऑगस्ट, २००९]

**सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व बालकांकरिता मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतास लागू असेल.

(३) तो, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

[1][(४) संविधानाच्या अनुच्छेद २९ व ३० च्या तरतुदींना अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदी, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे हक्क प्रदान करण्यासाठी लागू होतील.

(५) या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, मुख्यत: धार्मिक शिक्षण देणाऱ्या मदरशांना, वैदिक पाठशाळांना व शैक्षणिक संस्थांना लागू होणार नाही.]

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(क) " समुचित शासन " याचा अर्थ,—

(एक) केंद्र सरकारने किंवा विधानमंडळ नसलेल्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासकाने स्थापन केलेल्या, त्यांची मालकी असलेल्या किंवा त्यांचे नियंत्रण असलेल्या शाळेच्या संबंधात, केंद्र सरकार, असा आहे ;

(दोन) उपखंड (एक) मध्ये निर्देशिलेल्या शाळेखेरीज,—

(**क**) राज्यक्षेत्रात स्थापन केलेल्या अन्य शाळेच्या संबंधात, राज्य शासन, असा आहे ;

(**ख**) विधानमंडळ असलेल्या संघ राज्यक्षेत्रात स्थापन केलेल्या अन्य शाळेच्या संबंधात, त्या संघ राज्यक्षेत्राचे शासन, असा आहे ;

(ख) " कॅपिटेशन फी " याचा अर्थ, शाळेने अधिसूचित केलेल्या फी खेरीज अन्य कोणत्याही प्रकारची देणगी किंवा अंशदान किंवा अधिदान, असा आहे ;

(ग) " बालक " याचा अर्थ, सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलगा किंवा मुलगी, असा आहे ;

(घ) " वंचित गटातील बालक " याचा अर्थ, [2][विकलांगता असलेले बालक किंवा] अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग यांतील किंवा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक, भाषिक, लिंगभेदविषयक घटकांमुळे किंवा समुचित शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य घटकांमुळे वंचित असलेल्या इतर गटातील बालक, असा आहे ;

(ङ) " दुर्बल घटकातील बालक " याचा अर्थ, समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या किमान मर्यादेहून ज्यांचे वार्षिक उत्पन्न कमी आहे अशा मातापिता यांचे किंवा पालकाचे बालक, असा आहे ;

[3][(ङङ) " विकलांगता असलेले बालक " यात,—

१९९६ चा १. (**क**) विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ याच्या कलम २ च्या खंड (झ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, " विकलांगता " असलेले एखादे बालक ;

१९९९ चा ४४. (**ख**) स्वमग्नता, मेंदूचा अर्धांगवायू, मतिमंदता व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९ याच्या कलम २ च्या (ज) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, विकलांग व्यक्ती असलेले एखादे बालक ;

१९९९ चा ४४. (**ग**) स्वमग्नता, मेंदूचा अर्धांगवायू, मतिमंदता व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९ याच्या कलम २ च्या खंड (ण) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे गंभीर विकलांगता असलेले एखादे बालक,

यांचा समावेश होतो.]

---

[1] सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम २ द्वारे समाविष्ट केला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) द्वारे समाविष्ट केला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३(ख) द्वारे समाविष्ट केला.

(च) " प्राथमिक शिक्षण " याचा अर्थ, इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण, असा आहे ;

(छ) एखाद्या बालकाच्या संबंधात " पालक " याचा अर्थ, त्या बालकाची देखभाल करणारी व त्याचा ताबा असलेली व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, नैसर्गिक पालकाचा, किंवा न्यायालयाद्वारे किंवा कायद्याद्वारे नियुक्त केलेल्या किंवा घोषित केलेल्या पालकाचा समावेश होतो ;

(ज) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी महानगरपालिका किंवा नगरपरिषद किंवा जिल्हा परिषद किंवा नगर पंचायत किंवा पंचायत, असा आहे, आणि त्यामध्ये, शाळेवर प्रशासकीय नियंत्रण असलेले, किंवा कोणत्याही शहरात, नगरात किंवा गावात " स्थानिक प्राधिकरण " म्हणून कार्य करण्यासाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये अधिकार प्रदान केलेले असे अन्य प्राधिकरण किंवा निकाय, याचा समावेश होतो ;

(झ) " राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग " याचा अर्थ, बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेला राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग, असा आहे ; २००६ चा ४.

(ञ) " अधिसूचना " याचा अर्थ, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे ;

(ट) " मातापिता " याचा अर्थ, बालकाचा नैसर्गिक अथवा सावत्र किंवा दत्तक पिता अथवा माता, असा आहे ;

(ठ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ड) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ढ) " शाळा " याचा अर्थ, प्राथमिक शिक्षण देणारी कोणतीही मान्यताप्राप्त शाळा, असा आहे आणि त्यामध्ये,—

(एक) समुचित शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेली, त्याची मालकी असलेली किंवा त्याचे नियंत्रण असलेली शाळा ;

(दोन) समुचित शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून शाळेसाठीचा पूर्णत: किंवा अंशत: खर्च भागविण्यासाठी साहाय्य किंवा अनुदाने घेणारी अनुदानित शाळा ;

(तीन) विनिर्दिष्ट प्रवर्गातील शाळा ; आणि

(चार) समुचित शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून आपल्या शाळेसाठीचा खर्च भागविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे साहाय्य किंवा अनुदाने न घेणारी विनाअनुदानित शाळा, यांचा समावेश होतो ;

(ण) " छाननी पद्धती " याचा अर्थ, एका बालकापेक्षा दुसऱ्या बालकास अधिक पसंती देऊन, त्या बालकाच्या प्रवेशासाठी असलेल्या यादृच्छिक पद्धतीखेरीज, अन्य निवडीची पद्धत, असा आहे ;

(त) एखाद्या शाळेच्या संबंधात " विनिर्दिष्ट प्रवर्ग " याचा अर्थ, केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय, सैनिकी शाळा म्हणून ओळखली जाणारी शाळा किंवा समुचित शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी, विशिष्ट स्वरूप असलेली इतर कोणतीही शाळा, असा आहे ;

(थ) " राज्य बालहक्क संरक्षण आयोग " याचा अर्थ, बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ याच्या कलम ३ अन्वये घटित केलेला राज्य बालहक्क संरक्षण आयोग, असा आहे. २००६ चा ४.

## प्रकरण दोन

### मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क

बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क.

३. [1][(१) कलम २ च्या खंड (घ) किंवा खंड (ङ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एखाद्या बालकासह, सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास त्याचे किंवा तिचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत नजीकच्या शाळेत मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क असेल.]

(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनासाठी, कोणतेही बालक, ज्यामुळे त्याला किंवा तिला प्राथमिक शिक्षण घेण्यापासून आणि ते पूर्ण करण्यापासून प्रतिबंध होईल अशा कोणत्याही प्रकारची फी किंवा आकार किंवा खर्च देण्यास दायी असणार नाही :

[2][* * * * * *]

[1] सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम ४(क) द्वारे पोटकलम दाखल केले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४(ख) द्वारे परंतुक वगळले.

[1][(३) कलम २ च्या खंड (डड) च्या उपखंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेले विकलांगता असलेले एखादे बालक, विकलांग
१९९६ चा व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण व पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ याच्या तरतुदींना बाध येऊ न देता, आणि
१. कलम २ च्या खंड (डड) च्या उपखंड (ख) व (ग) यांमध्ये निर्दिष्ट केलेले एखादे बालक, यांना, विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ याच्या प्रकरण पाचच्या तरतुदींन्वये, विकलांगता असलेल्या बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी जे हक्क असतील तेच हक्क असतील :

परंतु असे की, स्वमग्नता, मेंदूचा अर्धांगवायू, मतिमंदता व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता
१९९९ चा राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९ याच्या कलम २ च्या खंड (ज) मध्ये निर्दिष्ट केलेले " बहुविध विकलांगता " असलेले
४४. एखादे बालक आणि कलम २ च्या खंड (ण) मध्ये निर्दिष्ट केलेले " गंभीर विकलांगता " असलेले एखादे बालक, यास घरी राहून शिक्षण घेण्याच्या पर्यायाचादेखील हक्क असेल.]

४. सहा वर्षांपेक्षा अधिक वयाच्या बालकाने कोणत्याही शाळेत प्रवेश घेतलेला नसेल किंवा प्रवेश घेतलेला असला तरी, त्याला किंवा तिला आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करता आले नसेल तेव्हा, त्याला किंवा तिला, त्याच्या किंवा तिच्या वयाला योग्य असलेल्या वर्गात प्रवेश देण्यात येईल : प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश न घेतलेल्या किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण न केलेल्या बालकांसाठी विशेष तरतुदी.

परंतु असे की, एखाद्या बालकाने, त्याच्या किंवा तिच्या वयाला योग्य असलेल्या वर्गात थेट प्रवेश घेतलेला असेल तेव्हा, त्याला किंवा तिला, इतर बालकांबरोबरच, विहित करण्यात येईल अशा रीतीने, आणि अशा कालमर्यादेच्या आत विशेष प्रशिक्षण मिळण्याचा हक्क असेल :

परंतु आणखी असे की, प्राथमिक शिक्षणासाठी ज्या बालकास अशा रीतीने प्रवेश देण्यात आलेला असेल ते बालक, वयाची चौदा वर्षे पूर्ण झाल्यानंतरसुद्धा प्राथमिक शिक्षण पूर्ण करीपर्यंत मोफत शिक्षणासाठी हक्कदार असेल.

५. (१) एखाद्या शाळेत, प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याबद्दलची कोणतीही तरतूद नसेल त्याबाबतीत, एखाद्या बालकास, त्याचे किंवा तिचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी, कलम २ च्या खंड (ढ) चे उपखंड (तीन) व (चार) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा वगळून, इतर कोणत्याही शाळेत दाखल करून घेण्याची मागणी करण्याचा हक्क असेल. दुसऱ्या शाळेत दाखल होण्याचा हक्क.

(२) एखाद्या बालकास, कोणत्याही कारणामुळे एकतर राज्यांतर्गत किंवा राज्याबाहेरील एका शाळेतून दुसऱ्या शाळेत जाणे आवश्यक असेल त्या बाबतीत, अशा बालकास, त्याचे किंवा तिचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी कलम २ च्या खंड (ढ) चे उपखंड (तीन) व (चार) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा वगळून, अन्य कोणत्याही शाळेत दाखल करून घेण्याची मागणी करण्याचा हक्क असेल.

(३) अशा अन्य शाळेत प्रवेश घेण्यासाठी, ज्या शाळेत अशा बालकाने शेवटी प्रवेश घेतला होता त्या शाळेचा मुख्याध्यापक किंवा प्रभारी व्यक्ती, तात्काळ शाळा बदली प्रमाणपत्र देईल :

परंतु असे की, शाळा बदली प्रमाणपत्र सादर करण्यात होणारा विलंब हा, अशा अन्य शाळेतील प्रवेशासाठी विलंब करण्याचे किंवा प्रवेश नाकारण्याचे कारण ठरणार नाही :

परंतु आणखी असे की, शाळा बदली प्रमाणपत्र देण्यास विलंब करणारा त्या शाळेचा मुख्याध्यापक किंवा प्रभारी व्यक्ती ही, त्याला किंवा तिला लागू असलेल्या सेवा नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असेल.

## प्रकरण तीन

## समुचित शासन, स्थानिक प्राधिकरण आणि मातापिता यांची कर्तव्ये

६. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, समुचित शासन आणि स्थानिक प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशा क्षेत्रात किंवा नजीकच्या क्षेत्राच्या हद्दीत, जेथे कोणतीही शाळा स्थापन केलेली नसेल तेथे, या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन वर्षांच्या कालावधीच्या आत, अशी शाळा स्थापन करील. समुचित शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांचे शाळा स्थापन करण्याचे कर्तव्य.

७. (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता निधी पुरविण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य शासन यांची समवर्ती जबाबदारी राहील. आर्थिक व इतर जबाबदाऱ्या वाटून घेणे.

(२) केंद्र सरकार या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी भांडवली व आवर्ती खर्चाचे अंदाज तयार करील.

(३) केंद्र सरकार, राज्य शासनांशी विचारविनिमय करून वेळोवेळी निर्धारित करील तितक्या प्रमाणात पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेला खर्च, महसुलास अशी सहायक अनुदाने म्हणून राज्य शासनांना देईल.

[1] सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम ४ (ग) द्वारे समाविष्ट केले.

(४) केंद्र सरकार, कोणत्याही राज्य शासनाकरिता तरतूद करावयाच्या अतिरिक्त साधनसंपत्तीच्या आवश्यकतेची तपासणी करण्यासाठी, अनुच्छेद २८० च्या खंड (३) च्या उपखंड (घ) अन्वये वित्त आयोगाकडे निदेश करण्याची राष्ट्रपतींना विनंती करू शकेल, जेणेकरून, उक्त राज्य शासनांना या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या हिश्श्याच्या निधीची तरतूद करता येईल.

(५) पोटकलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, पोटकलम (३) अन्वये केंद्र सरकारकडून राज्य शासनाला देण्यात आलेल्या रकमा आणि त्याची इतर साधनसंपत्ती विचारात घेऊन, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी निधी देण्यास जबाबदार असेल.

(६) केंद्र सरकार,—

(क) कलम २९ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षण प्राधिकरणाच्या साहाय्याने राष्ट्रीय अभ्यासक्रमाची एक रूपरेषा विकसित करील ;

(ख) शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी मानके विकसित करील आणि त्यांची अंमलबजावणी करील ;

(ग) नवकल्पना, संशोधन, नियोजन आणि क्षमता विकसित करण्यास प्रोत्साहन देण्याकरिता राज्य शासनाला तांत्रिक साहाय्य व साधनसंपत्ती पुरवील.

समुचित शासनाची कर्तव्ये.

८. समुचित शासन,—

(क) प्रत्येक बालकास मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद करील :

परंतु असे की, एखाद्या बालकाचा प्रवेश त्याच्या किंवा तिच्या मातापित्याने किंवा, यथास्थिति, पालकाने, समुचित शासन किंवा स्थानिक प्राधिकरण याने स्थापन केलेल्या, त्याची मालकी असलेल्या, त्याचे नियंत्रण असलेल्या किंवा त्याच्याकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पुरविण्यात आलेल्या निधीतून भरीव प्रमाणात वित्त पुरवठा केलेल्या शाळेखेरीज, अन्य शाळेत घेतला असेल त्याबाबतीत, यथास्थिति, असे बालक किंवा त्याचे वा तिचे मातापिता किंवा त्याचा वा तिचा पालक, अशा अन्य शाळेत बालकाच्या प्राथमिक शिक्षणावर केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करण्यास हक्कदार असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—" सक्तीचे शिक्षण " याचा अर्थ, पुढील गोष्टी करण्याचे समुचित शासनावरील आबंधन, असा आहे,—

(एक) सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद करणे ;

(दोन) सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाच्या सक्तीच्या प्रवेशाची, शाळेतील हजेरीची आणि त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले जात असल्याची सुनिश्चिती करणे ;

(ख) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, नजीकची शाळा उपलब्ध होण्याची सुनिश्चिती करील ;

(ग) दुर्बल घटकातील बालक आणि वंचित गटातील बालक यांच्या संबंधात कोणत्याही कारणांवरून प्राथमिक शिक्षण घेण्याच्या बाबतीत आणि ते पूर्ण करण्याच्या बाबतीत भेदभाव केला जाणार नाही आणि त्यास प्रतिबंध केला जाणार नाही, याची सुनिश्चिती करील ;

(घ) शाळेची इमारत, अध्यापकवर्ग व अध्ययन साहित्य यांसह पायाभूत सुविधा पुरवील ;

(ङ) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष प्रशिक्षण सुविधेची तरतूद करील ;

(च) प्रत्येक बालकाच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रवेश, उपस्थिती आणि ते पूर्ण केले जात असल्याची सुनिश्चिती करील व त्यावर संनियंत्रण ठेवील ;

(छ) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली प्रमाणके व मानके यांनुसार उत्तम दर्जाच्या प्राथमिक शिक्षणाची सुनिश्चिती करील ;

(ज) प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रम वेळेवर विहित करण्यात येत असल्याची सुनिश्चिती करील ; आणि

(झ) शिक्षकांसाठी प्रशिक्षण सुविधांची तरतूद करील.

स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये.

९. प्रत्येक स्थानिक प्राधिकरण,—

(क) प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद करील :

परंतु असे की, एखाद्या बालकाचा प्रवेश त्याच्या किंवा तिच्या मातापित्याने किंवा, यथास्थिति, पालकाने, समुचित शासन किंवा स्थानिक प्राधिकरण याने स्थापन केलेल्या, त्याची मालकी असलेल्या, त्याचे नियंत्रण असलेल्या किंवा त्याच्याकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पुरविण्यात आलेल्या निधीतून भरीव प्रमाणात वित्त पुरवठा केलेल्या शाळेखेरीज अन्य शाळेत घेतला असेल त्याबाबतीत, यथास्थिति, असे बालक किंवा त्याचे वा तिचे मातापिता किंवा त्याचा वा तिचा पालक, अशा अन्य शाळेत बालकाच्या प्राथमिक शिक्षणावर केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करण्यास हक्कदार असणार नाही ;

(ख) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नजीकची शाळा उपलब्ध होण्याची सुनिश्चिती करील ;

(ग) दुर्बल घटकातील बालक आणि वंचित गटातील बालक यांच्या संबंधात, कोणत्याही कारणावरून प्राथमिक शिक्षण घेण्याच्या बाबतीत आणि ते पूर्ण करण्याच्या बाबतीत भेदभाव केला जाणार नाही आणि त्यास प्रतिबंध केला जाणार नाही याची सुनिश्चिती करील ;

(घ) त्याच्या अधिकारक्षेत्रात राहणाऱ्या चौदा वर्षे वयापर्यंतच्या बालकांचा अभिलेख विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवील ;

(ङ) त्याच्या अधिकारक्षेत्रात राहणाऱ्या प्रत्येक बालकाच्या शाळा प्रवेशाची, शाळेतील हजेरीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण केले जात असल्याची सुनिश्चिती करील व त्यावर संनियंत्रण ठेवील ;

(च) शाळेची इमारत, अध्यापकवर्ग आणि अध्ययन साहित्य यांसह पायाभूत सुविधा पुरवील ;

(छ) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष प्रशिक्षण सुविधेची तरतूद करील ;

(ज) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व प्रमाणके यांनुसार उत्तम दर्जाच्या प्राथमिक शिक्षणाची सुनिश्चिती करील ;

(झ) प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम व पाठ्यक्रम वेळेवर विहित करण्यात येत असल्याची सुनिश्चिती करील ;

(ञ) शिक्षकांसाठी प्रशिक्षण सुविधा पुरवील ;

(त) स्थलांतरित कुटुंबातील बालकांच्या प्रवेशाबाबत सुनिश्चिती करील ;

(थ) त्याच्या अधिकारक्षेत्रातील शाळांच्या कामकाजाचे संनियंत्रण करील ; आणि

(द) शैक्षणिक कॅलेंडर निश्चित करील.

१०. प्रत्येक मातापित्याने किंवा पालकाने त्याच्या किंवा तिच्या बालकाला किंवा, यथास्थिति, पाल्याला नजीकच्या शाळेत प्राथमिक शिक्षणासाठी दाखल करणे किंवा दाखल करण्याची व्यवस्था करणे हे त्यांचे कर्तव्य असेल. मातापिता व पालक यांचे कर्तव्य.

११. तीन वर्षांवरील बालकांना प्राथमिक शिक्षण घेण्यास तयार करण्याच्या आणि सर्व बालकांसाठी, त्यांच्या वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांची तरतूद करण्याच्या हेतूने, समुचित शासनास, अशा सर्व बालकांना मोफत शाळापूर्व शिक्षण देण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करता येईल. समुचित शासनाने शाळापूर्व शिक्षणाची तरतूद करणे.

## प्रकरण चार

## शाळांच्या व शिक्षकांच्या जबाबदाऱ्या

१२. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ,– मोफत व सक्तीच्या शिक्षणाबाबत शाळेच्या जबाबदारीची व्याप्ती.

(क) कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा, त्या शाळेत प्रवेश घेतलेल्या सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देईल ;

(ख) कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा, तिचा वार्षिक सरासरी खर्च सोसण्यासाठी तिला जे वार्षिक आवर्ती साहाय्य किंवा अनुदान मिळेल त्या प्रमाणात तीत प्रवेश घेतलेल्या बालकांना, परंतु किमान पंचवीस टक्क्यांच्या अधीन राहून, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देईल :

(ग) कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (तीन) व (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा, नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थीसंख्येच्या किमान पंचवीस टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल :

परंतु असे की, कलम २ च्या खंड (ढ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली एखादी शाळा, जेव्हा शाळापूर्व शिक्षण देत असेल तेव्हा, अशा शाळापूर्व शिक्षणासाठी प्रवेश घेण्याकरिता खंड (क) ते (ग) च्या तरतुदी लागू होतील.

(२) पोटकलम (१) च्या खंड (ग) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणाऱ्या कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शाळेला, तिने अशा प्रकारे केलेल्या खर्चाची, राज्याने प्रत्येक

बालकामागे केलेला खर्च, किंवा बालकाकडून आकारण्यात आलेली प्रत्यक्ष रक्कम, यांपैकी जी कमी असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत रक्कम विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रतिपूर्ती करण्यात येईल :

परंतु असे की, अशी प्रतिपूर्ती कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शाळेने प्रत्येक बालकामागे केलेल्या खर्चाच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, अशा शाळेवर तिला कोणतीही जमीन, इमारत, साधनसामग्री किंवा इतर सुविधा एकतर मोफत किंवा सवलतीच्या दरात मिळाल्याच्या कारणावरून विनिर्दिष्ट संख्येतील बालकांना मोफत शिक्षण देण्याचे आबंधन अगोदरच घातलेले असल्यास, अशी शाळा, अशा आबंधनाच्या मर्यादेपर्यंत प्रतिपूर्तीसाठी हक्कदार असणार नाही.

(३) प्रत्येक शाळा समुचित शासन किंवा यथास्थिति, स्थानिक प्राधिकरण मागवील अशी माहिती पुरवील.

**प्रवेशासाठी कोणतीही कॅपिटेशन फी किंवा छाननी पद्धती नसणे.**

१३. (१) कोणतीही शाळा किंवा व्यक्ती बालकाला प्रवेश देताना, कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मातापित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

(२) कोणतीही शाळा किंवा व्यक्ती, पोटकलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून,–

(क) कॅपिटेशन फी घेईल तर, ती, आकारलेल्या कॅपिटेशन फीच्या दहा पट असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल ;

(ख) एखाद्या बालकास छाननी पद्धतीसाठी भाग पाडील तर, ती पहिल्या उल्लंघनाबद्दल पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल आणि त्यानंतरच्या प्रत्येक उल्लंघनाबद्दल पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**प्रवेशासाठी वयाचा पुरावा.**

१४. (१) प्राथमिक शिक्षणाकरिता प्रवेशाच्या प्रयोजनांसाठी, बालकाचे वय हे जन्म, मृत्यु व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६
१८८६ याच्या तरतुदींनुसार देण्यात आलेल्या जन्माच्या दाखल्याच्या आधारे किंवा विहित करण्यात येईल अशा अन्य चा ६.
कोणत्याही दस्तऐवजाच्या आधारे निर्धारित करण्यात येईल.

(२) वयाच्या पुराव्याच्या अभावी कोणत्याही बालकास, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

**प्रवेश देण्यास नकार न देणे.**

१५. बालकास, शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला किंवा विहित करण्यात येईल अशा वाढीव कालावधीमध्ये शाळेत प्रवेश देण्यात येईल :

परंतु असे की, वाढीव कालावधीनंतर जर असा प्रवेश मागितला असेल तर कोणत्याही बालकास प्रवेश नाकारण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, वाढीव कालावधीनंतर प्रवेश देण्यात आलेले कोणतेही बालक, समुचित शासनाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याचा अभ्यास पूर्ण करील.

**मागे ठेवण्यास व काढून टाकण्यास मनाई.**

१६. शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास, कोणत्याही इयत्तेत मागे ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**बालकास शारीरिक शिक्षा करण्यास आणि मानसिक त्रास देण्यास मनाई.**

१७. (१) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदींचे जी कोणतीही व्यक्ती उल्लंघन करील, अशा व्यक्तीला लागू असणाऱ्या सेवा नियमांअन्वये ती, शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असेल.

**मान्यता प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय कोणतीही शाळा स्थापन न करणे.**

१८. (१) समुचित शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या, त्याची मालकी असलेल्या किंवा त्याचे नियंत्रण असलेल्या शाळेव्यतिरिक्त इतर कोणतीही शाळा, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने अर्ज करून अशा प्राधिकरणाकडून मान्यता प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, स्थापन करण्यात येणार नाही किंवा ती सुरू करण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये विहित केलेले प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा कालावधीमध्ये, अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीन राहून मान्यता प्रमाणपत्र देईल :

परंतु असे की, एखाद्या शाळेने कलम १९ अन्वये प्रमाणके आणि मानके यांची पूर्तता केल्याखेरीज, अशा शाळेला मान्यता देण्यात येणार नाही.

(३) मान्यतेसाठीच्या शर्तींचे उल्लंघन केल्यावर विहित प्राधिकरण लेखी आदेशाद्वारे मान्यता काढून घेईल :

परंतु असे की, अशा प्रकारे मान्यता काढून घेतलेल्या शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना, नजीकच्या कोणत्या शाळेत प्रवेश घेता येईल याबद्दलचे निदेश, अशा आदेशात दिलेले असतील :

परंतु आणखी असे की, अशा शाळेला, विहित करण्यात येईल अशा रीतीने, आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज, अशा प्रकारे मान्यता काढून घेण्यात येणार नाही. -

(४) पोटकलम (३) अन्वये मान्यता काढून घेतल्याच्या दिनांकापासून, अशी शाळा आपले कार्य चालू ठेवणार नाही.

(५) जी कोणतीही व्यक्ती, मान्यता प्रमाणपत्र मिळविल्याखेरीज एखादी शाळा स्थापन करील किंवा चालवील किंवा मान्यता काढून घेतल्यानंतरही शाळा चालूच ठेवील, ती, एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि ज्या कालावधीत असे उल्लंघन करण्याचे चालू ठेवले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसाकरिता दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

१९. (१) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके आणि प्रमाणके यांची पूर्तता केल्याखेरीज, कलम १८ अन्वये कोणतीही शाळा स्थापन करण्यात येणार नाही किंवा तिला मान्यता देण्यात येणार नाही. शाळेसाठी असलेली मानके आणि प्रमाणके.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी स्थापन केलेली एखादी शाळा, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके आणि प्रमाणके यांची पूर्तता करीत नसेल तर, ती शाळा अशा प्रारंभाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीत, अशी मानके आणि प्रमाणके यांची स्वखर्चाने पूर्तता करण्यासाठी पावले उचलील.

(३) जर एखादी शाळा, पोटकलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत मानके आणि प्रमाणके यांची पूर्तता करण्यात कसूर करील तर, कलम १८ च्या पोटकलम (१) अन्वये विहित केलेले प्राधिकरण, त्या कलमातील पोटकलम (३) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने अशा शाळेला दिलेली मान्यता काढून घेईल.

(४) पोटकलम (३) अन्वये मान्यता काढून घेतल्याच्या दिनांकापासून अशी कोणतीही शाळा आपले कार्य चालू ठेवणार नाही.

(५) जी कोणतीही व्यक्ती, मान्यता काढून घेतल्यानंतर शाळा चालविणे सुरूच ठेवील, ती, एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि ज्या कालावधीत असे उल्लंघन करण्याचे चालू ठेवले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसाकरिता दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, पात्र असेल.

२०. केंद्र सरकारला, अधिसूचनेद्वारे, अनुसूचीमध्ये कोणतीही मानके आणि प्रमाणके यांची भर घालून किंवा ती वगळून त्या अनुसूचीची सुधारणा करता येईल. अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

२१. (१) कलम २, खंड (ढ), उपखंड (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शाळेखेरीज इतर शाळा, एक शाळा व्यवस्थापन समिती घटित करील. या समितीमध्ये, स्थानिक प्राधिकरण, अशा शाळेत प्रवेश दिलेल्या बालकांचे मातापिता किंवा पालक आणि शिक्षक यांच्यामधून निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा समावेश असेल : शाळा व्यवस्थापन समिती.

परंतु असे की, अशा समितीतील किमान तीन चतुर्थांश सदस्य हे मातापिता किंवा पालक असतील :

परंतु आणखी असे की, वंचित गटातील आणि दुर्बल घटकातील बालकांचे मातापिता किंवा पालक यांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्यात येईल :

परंतु तसेच, अशा समितीतील पन्नास टक्के सदस्य या महिला असतील.

(२) शाळा व्यवस्थापन समिती पुढील कार्ये पार पाडील :—

(क) शाळेच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे ;

(ख) शाळा विकास योजना तयार करून तिची शिफारस करणे ;

(ग) समुचित शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून अथवा इतर कोणत्याही मार्गाने मिळालेल्या निधीच्या वापराचे संनियंत्रण करणे; आणि

(घ) विहित करण्यात येतील अशी इतर कामे पार पाडणे :

[1][परंतु असे की, पोटकलम (१) अन्वये घटित करण्यात आलेली शाळा व्यवस्थापन समिती,—

(क) अल्पसंख्याक समाजाने स्थापन केलेली आणि त्यांच्याकडून चालविण्यात येणारी शाळा—मग ती धर्मावर आधारित असो किंवा भाषेवर आधारित असो— आणि

(ख) कलम २ च्या खंड (ढ) च्या पोटकलम (दोन) मध्ये व्याख्या केलेल्या अन्य सर्व अनुदानित शाळा,

यांच्या संबंधात, केवळ सल्लागाराचे कार्य पार पाडील.]

---

[1] सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम ५ द्वारे, परंतुक समाविष्ट केले.

**शाळा विकास योजना.** २२. (१) [1][अल्पसंख्याक समाजाने स्थापन केलेली व त्यांच्याकडून चालविण्यात येणारी शाळा-मग ती धर्मावर आधारित असो किंवा भाषेवर आधारित असो—आणि कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (दोन) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे अनुदानित शाळा, यांच्या संबंधातील शाळा व्यवस्थापन समितीव्यतिरिक्त, कलम २१ च्या पोटकलम (१) अन्वये घटित करण्यात आलेली प्रत्येक शाळा व्यवस्थापन समिती,] विहित करण्यात येईल अशा रीतीने शाळा विकास योजना तयार करील.

(२) समुचित शासनाने किंवा, यथास्थिति, स्थानिक प्राधिकरणाने तयार करावयाच्या योजनांसाठी व मिळावयाच्या अनुदानांसाठी पोटकलम (१) अन्वये अशा प्रकारे तयार केलेली शाळा विकास योजना ही आधार असेल.

**शिक्षकांच्या नियुक्तीसाठी अर्हता आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.** २३. (१) केंद्र सरकारने अधिसूचनेद्वारे प्राधिकृत केलेल्या शैक्षणिक प्राधिकरणाने निर्धारित केली असेल अशी किमान अर्हता धारण करणारी कोणतीही व्यक्ती, शिक्षक म्हणून नियुक्त केली जाण्यास पात्र असेल.

(२) एखाद्या राज्यात, अध्यापक शिक्षणाचे पाठ्यक्रम चालवणाऱ्या किंवा प्रशिक्षण देणाऱ्या पुरेशा संस्था नसतील, अथवा पोटकलम (१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणारे पुरेसे शिक्षक उपलब्ध नसतील त्याबाबतीत, केंद्र सरकारला त्यास आवश्यक वाटल्यास, अधिसूचनेद्वारे तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, पाच वर्षांहून अधिक नसलेल्या कालावधीकरिता, शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता, शिथिल करता येईल:

परंतु असे की, जो शिक्षक, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी, पोटकलम (१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करीत नसेल, तो, पाच वर्षांच्या कालावधीत अशी किमान अर्हता प्राप्त करील.

(३) शिक्षकांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, विहित करण्यात येतील अशा असतील.

**शिक्षकांची कर्तव्ये आणि त्यांच्या गाऱ्हाण्यांचे निवारण.** २४. (१) कलम २३, पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला शिक्षक, पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(क) शाळेत नियमितपणे व वक्तशीरपणे हजर राहणे ;

(ख) कलम २९, पोटकलम (२) च्या तरतुदींनुसार अभ्यासक्रम घेणे व तो पूर्ण करणे ;

(ग) विनिर्दिष्ट कालावधीत संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करणे ;

(घ) प्रत्येक बालकाच्या अध्ययन क्षमतेचे निर्धारण करणे आणि त्यानुसार कोणतीही आवश्यकता भासल्यास, पूरक म्हणून अतिरिक्त शिक्षण देणे ;

(ङ) मातापिता आणि पालकांबरोबर नियमित पालकसभा घेऊन, त्यांना बालकांची नियमित हजेरी, अध्ययन क्षमता, अध्ययनातील प्रगती याबाबतची माहिती आणि बालकांशी संबद्ध अशी इतर कोणतीही माहिती देणे ; आणि

(च) विहित करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

(२) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये पार पाडण्यात जो शिक्षक कसूर करील, तो, त्याला अथवा तिला लागू असलेल्या सेवानियमांन्वये शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास पात्र असेल :

परंतु असे की, अशी शिस्तभंगाची कारवाई करण्यापूर्वी, अशा शिक्षकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(३) शिक्षकांची, कोणतीही गाऱ्हाणी असल्यास, त्यांचे विहित करण्यात येईल अशा रीतीने निवारण करण्यात येईल.

**विद्यार्थी-शिक्षक प्रमाण.** २५. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून [2][तीन वर्षांच्या आत], प्रत्येक शाळेत, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्यात येत आहे याची, समुचित शासन आणि स्थानिक प्राधिकरण, सुनिश्चिती करील.

(२) पोटकलम (१) अन्वये, विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्याच्या प्रयोजनासाठी, शाळेत नेमणूक केलेल्या कोणत्याही शिक्षकास इतर कोणत्याही शाळेत किंवा कार्यालयात काम करण्यास भाग पाडले जाणार नाही किंवा त्यास कलम २७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कामांखेरीज इतर कोणत्याही अशैक्षणिक प्रयोजनांसाठी कामावर लावण्यात येणार नाही.

**शिक्षकांची रिक्त पदे भरणे.** २६. समुचित शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या, त्याची मालकी असलेल्या, त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या किंवा त्याच्याकडून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे पुरविलेल्या निधीतून भरीवपणे वित्तव्यवस्था केलेल्या शाळांच्या संबंधात, नियुक्ती प्राधिकरण, त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे, एकूण मंजूर पदांच्या दहा टक्क्यांहून अधिक असणार नाहीत याची खात्री करील.

---

[1] सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम ९ द्वारे दाखल केला.

[2] उक्त अधिनियमाच्या कलम ७ द्वारे दाखल केला.

२७. कोणत्याही शिक्षकाला, दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे किंवा स्थानिक प्राधिकरण अथवा राज्य विधानमंडळे किंवा यथास्थिति, संसदेच्या निवडणुकांच्या कर्तव्यांखेरीज, इतर कोणत्याही अशैक्षणिक प्रयोजनांसाठी कामावर लावण्यात येणार नाही. अशैक्षणिक प्रयोजनांसाठी शिक्षकांची नेमणूक करण्यास मनाई.

२८. कोणताही शिक्षक खाजगी शिकवणी घेणार नाही अथवा खाजगीरीत्या शिकवण्याच्या कामात स्वतःला गुंतवून घेणार नाही. शिक्षकाने खाजगी शिकवणी घेण्यास मनाई.

## प्रकरण पाच

## प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व तो पूर्ण करणे

२९. (१) प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रिया ही, समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करावयाच्या शिक्षण प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल. अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रिया.

(२) शैक्षणिक प्राधिकरण, पोटकलम (१) अन्वये अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रिया विहित करताना, पुढील बाबी विचारात घेईल, त्या अशा :—

(क) संविधानातील अधिष्ठित मूल्यांशी सुसंगती ;

(ख) बालकांचा सर्वांगीण विकास ;

(ग) बालकाचे ज्ञान, क्षमता व विशेष बुद्धिमत्ता यांचे संवर्धन ;

(घ) शारीरिक व मानसिक क्षमतांचा जास्तीत जास्त विकास ;

(ङ) बालकानुकूल व बालककेंद्री पद्धतीने उपक्रम, शोध व संशोधन या माध्यमातून शिक्षण ;

(च) व्यवहार्य असेल तेथवर शिक्षणाचे माध्यम बालकाची मातृभाषा असेल ;

(छ) बालकाला भय, दडपण व चिंता यांपासून मुक्त ठेवणे आणि मुक्तपणे विचार व्यक्त करण्यास मदत करणे ;

(ज) बालकाची आकलन शक्ती आणि तिचा उपयोग करण्याच्या त्याच्या किंवा तिच्या क्षमतेचे सर्वंकष व सातत्याने मूल्यमापन करणे.

३०. (१) कोणत्याही बालकास, प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही. परीक्षा व पूर्णता प्रमाणपत्र.

(२) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, प्रमाणपत्र देण्यात येईल.

## प्रकरण सहा

## बालकांच्या हक्काचे संरक्षण

२००६ चा ४. ३१. (१) बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ याच्या कलम ३ अन्वये घटित केलेला राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग किंवा यथास्थिति, कलम १७ अन्वये घटित केलेला राज्य बालहक्क संरक्षण आयोग, त्या अधिनियमाअन्वये त्यांना नेमून दिलेल्या कार्याव्यतिरिक्त पुढील कार्येदेखील पार पाडील :— बालकाच्या शिक्षणाच्या हक्काचे संनियंत्रण.

(क) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद केलेल्या हक्कांबद्दलच्या संरक्षक उपाययोजनांची तपासणी करणे व त्यांचा आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजनांची शिफारस करणे ;

(ख) बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काशी संबंधित तक्रारींची चौकशी करणे ; आणि

(ग) उक्त बालहक्क संरक्षण आयोग अधिनियमाची कलमे १५ व २४ यांअन्वये तरतूद केल्याप्रमाणे आवश्यक ती पावले उचलणे.

(२) उक्त आयोगांना पोटकलम (१), खंड (ग) अन्वये बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काशी संबंधित कोणत्याही बाबींची चौकशी करताना, उक्त बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम याची कलमे १४ व २४ यांअन्वये त्यांना अनुक्रमे जे अधिकार नेमून देण्यात आलेले असतील तेच अधिकार असतील.

(३) एखाद्या राज्यामध्ये राज्य बालहक्क संरक्षण आयोग घटित करण्यात आला नसेल त्याबाबतीत, समुचित शासनास, पोटकलम (१), खंड (क) ते (ग) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा अटी व शर्तींना अधीन राहून, असे प्राधिकरण घटित करता येईल.

गाऱ्हाण्यांचे निवारण. ३२. (१) कलम ३१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये कोणत्याही व्यक्तीला एखाद्या बालकाच्या हक्काशी संबंधित कोणतेही गाऱ्हाणे मांडावयाचे असल्यास तिला, अधिकारिता असलेल्या स्थानिक प्राधिकरणाकडे लेखी तक्रार करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये तक्रार प्राप्त झाल्यानंतर, स्थानिक प्राधिकरण, संबंधित पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत, त्या बाबीवर निर्णय देईल.

(३) स्थानिक प्राधिकरणाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य बालहक्क संरक्षण आयोगाकडे किंवा यथास्थिति, कलम ३१, पोटकलम (३) अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडे अपील करता येईल.

(४) पोटकलम (३) अन्वये केलेल्या अपिलावर, कलम ३१, पोटकलम (१), खंड (ग) अन्वये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार, राज्य बालहक्क संरक्षण आयोगाकडून किंवा यथास्थिति, कलम ३१, पोटकलम (३) अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडून निर्णय देण्यात येईल.

राष्ट्रीय सल्लागार परिषद घटित करणे. ३३. (१) केंद्र सरकार, प्राथमिक शिक्षण व बाल विकास या क्षेत्रातील ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून नेमणूक करावयाच्या, केंद्र सरकारला आवश्यक वाटतील परंतु पंधराहून अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून बनलेली राष्ट्रीय सल्लागार परिषद, अधिसूचनेद्वारे, घटित करील.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत केंद्र सरकारला सल्ला देणे हे राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे कार्य असेल.

(३) राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या सदस्यांचे भत्ते व त्यांच्या नेमणुकीच्या अन्य अटी व शर्ती विहित करण्यात येतील अशा असतील.

राज्य सल्लागार परिषद घटित करणे. ३४. (१) राज्य शासन प्राथमिक शिक्षण व बाल विकास या क्षेत्रातील ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून नेमणूक करावयाची, राज्य शासनास आवश्यक वाटतील परंतु पंधराहून अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून बनलेली राज्य सल्लागार परिषद, अधिसूचनेद्वारे, घटित करील.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत राज्य शासनास सल्ला देणे हे राज्य सल्लागार परिषदेचे कार्य असेल.

(३) राज्य सल्लागार परिषदेच्या सदस्यांचे भत्ते व त्यांच्या नेमणुकीच्या अन्य अटी व शर्ती विहित करण्यात येतील अशा असतील.

## प्रकरण सात

## संकीर्ण

निदेश देण्याचा अधिकार. ३५. (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास योग्य वाटतील अशी मार्गदर्शकतत्त्वे समुचित शासनाला किंवा यथास्थिति, स्थानिक प्राधिकरणाला ठरवून देता येतील.

(२) समुचित शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या संबंधात, त्यास योग्य वाटतील अशी मार्गदर्शकतत्त्वे व असे निदेश, स्थानिक प्राधिकरणाला किंवा शाळा व्यवस्थापन समितीला देता येतील.

(३) स्थानिक प्राधिकरणास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या संबंधात, त्यास योग्य वाटतील अशी मार्गदर्शकतत्त्वे व असे निदेश, शाळा व्यवस्थापन समितीला देता येतील.

खटला भरण्यासाठी पूर्वमंजुरी घेणे. ३६. कलम १३ चे पोटकलम (२), कलम १८ चे पोटकलम (५) आणि कलम १९ चे पोटकलम (५) यांखालील शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दलचा कोणताही खटला, समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय दाखल करता येणार नाही.

३७. या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश यांअन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कार्यवाहीसंबंधात, केंद्र सरकार, राज्य शासन, राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग, राज्य बालहक्क संरक्षण आयोग, स्थानिक प्राधिकरण, शाळा व्यवस्थापन समिती किंवा कोणतीही व्यक्ती, यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही केली जाणार नाही. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

३८. (१) समुचित शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी, अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. समुचित शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषकरून व पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी असे नियम करता येतील :–

(क) कलम ४ च्या पहिल्या परंतुकाअन्वये, विशेष प्रशिक्षण देण्याची रीत व त्याची कालमर्यादा ;

(ख) कलम ६ अन्वये नजीकची शाळा स्थापन करण्यासाठी क्षेत्र किंवा हद्द ;

(ग) कलम ९ च्या खंड (घ) अन्वये चौदा वर्षे वयापर्यंतच्या बालकांचा अभिलेख ठेवण्याची रीत ;

(घ) कलम १२ च्या पोटकलम (२) अन्वये खर्चाच्या प्रतिपूर्तीची रीत आणि मर्यादा ;

(ङ) कलम १४ च्या पोटकलम (१) अन्वये बालकाचे वय निर्धारित करणारा इतर कोणताही दस्तऐवज ;

(च) कलम १५ अन्वये प्रवेशासाठी वाढीव कालावधी आणि अशा वाढीव कालावधीनंतर प्रवेश देण्यात आला असेल तर, अभ्यास पूर्ण करण्याची रीत ;

(छ) कलम १८ च्या पोटकलम (१) अन्वये प्राधिकरण आणि मान्यता प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची रीत व अर्जाचा नमुना ;

(ज) कलम १८ च्या पोटकलम (२) अन्वये मान्यता प्रमाणपत्राचा नमुना, मान्यता प्रमाणपत्र देण्यासाठीचा कालावधी, त्याची रीत आणि त्याबद्दलच्या शर्ती ;

(झ) कलम १८ च्या पोटकलम (३) च्या दुसऱ्या परंतुकान्वये म्हणणे मांडण्याची संधी देण्याची रीत ;

(ञ) कलम २१ च्या पोटकलम (२) च्या खंड (घ) अन्वये शाळा व्यवस्थापन समितीने पार पाडावयाची इतर कार्ये ;

(ट) कलम २२ च्या पोटकलम (१) अन्वये शाळा विकास योजना तयार करण्याची रीत ;

(ठ) कलम २३ च्या पोटकलम (३) अन्वये शिक्षकांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ड) कलम २४ च्या पोटकलम (१) च्या खंड (च) अन्वये शिक्षकाने पार पाडावयाची कर्तव्ये ;

(ढ) कलम २४ च्या पोटकलम (३) अन्वये शिक्षकांच्या गाऱ्हाण्यांचे निवारण करण्याची रीत ;

(ण) कलम ३० च्या पोटकलम (२) अन्वये प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राचा नमुना व रीत ;

(त) कलम ३१ च्या पोटकलम (३) अन्वये प्राधिकरण, ते घटित करण्याची रीत आणि त्यासाठीच्या अटी व शर्ती ;

(थ) कलम ३३ च्या पोटकलम (३) अन्वये राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या सदस्यांचे भत्ते आणि त्यांच्या नेमणुकीच्या इतर अटी व शर्ती ;

(द) कलम ३४ च्या पोटकलम (३) अन्वये राज्य सल्लागार परिषदेच्या सदस्यांचे भत्ते आणि त्यांच्या नेमणुकीच्या इतर अटी व शर्ती

(३) या अधिनियमान्वये, केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम आणि कलमे २० व २३ यांअन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना, तो करण्यात/ती काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला/ठेवली जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात किंवा अधिसूचनेत कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात किंवा अधिसूचना काढण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर, तो नियम किंवा ती अधिसूचना अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमान्वये किंवा अधिसूचनेअन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(४)[1] या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम किंवा काढलेली अधिसूचना, तो करण्यात/ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवला/ठेवली जाईल.

केंद्र सरकारचा अडचणी दूर करण्याचा अधिकार.

[1][३९. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकारला, **राजपत्रात**, प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करता येतील :

परंतु असे की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (सुधारणा) अधिनियम, २०१२ याच्या प्रारंभापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.]

---

[1] सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३०, कलम ८ द्वारे समाविष्ट केला.

## अनुसूची

(कलम १९ आणि २५ पहा)

### शाळेसाठी मानके आणि प्रमाणके

| अनुक्रमांक | बाब | मानके आणि प्रमाणके | |
|---|---|---|---|
| १ | शिक्षकांची संख्या : | | |
| | (क) इयत्ता पहिली ते पाचवीसाठी | प्रवेश देण्यात आलेली बालके | शिक्षकांची संख्या |
| | | साठ पर्यंत | दोन |
| | | एकसष्ट ते नव्वद | तीन |
| | | एक्याण्णव ते एकशेवीस | चार |
| | | एकशे एकवीस ते दोनशे | पाच |
| | | एकशे पन्नासहून अधिक बालके | पाच आणि एक मुख्याध्यापक |
| | | दोनशेहून अधिक बालके | विद्यार्थी शिक्षक प्रमाण (मुख्याध्यापक वगळून) चाळीसपेक्षा अधिक नसेल. |
| | (ख) इयत्ता सहावी ते आठवीसाठी | (१) प्रत्येक इयत्तेसाठी किमान एक शिक्षक, जेणेकरुन<br>(एक) विज्ञान व गणित ;<br>(दोन) सामाजिक अभ्यास ;<br>(तीन) भाषा ;<br>या प्रत्येक विषयासाठी एक शिक्षक असेल.<br>(२) प्रत्येक पस्तीस बालकांसाठी किमान एक शिक्षक<br>(३) शंभराहून अधिक बालकांना प्रवेश दिला जातो तेथे–<br>(एक) पूर्णवेळ मुख्याध्यापक ;<br>(दोन) (क) कला शिक्षण ;<br>(ख) आरोग्य व शारीरिक शिक्षण ;<br>(ग) कार्यशिक्षण ;<br>यांसाठी अंशकालिक अनुदेशक. | |
| २ | इमारत | (एक) प्रत्येक शिक्षकासाठी किमान एक वर्ग खोली आणि कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली ;<br>(दोन) अडथळ्याविना प्रवेशमार्ग ;<br>(तीन) मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे ;<br>(चार) सर्व बालकांसाठी स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी पुरविण्याची सुविधा ;<br>(पाच) ज्या शाळेत दुपारचे जेवण शिजवले जाते तेथे एक स्वयंपाक घर ;<br>(सहा) क्रीडांगण ;<br>(सात) शाळेच्या इमारतीच्या सुरक्षिततेसाठी भिंत किंवा कुंपण घालून केलेली व्यवस्था ;<br>यांचा समावेश असलेली पक्की इमारत. | |

| अनुक्रमांक | बाब | मानके आणि प्रमाणके |
|---|---|---|
| ३ | शैक्षणिक वर्षामधील कामाचे किमान दिवस/अध्यापनाचे किमान तास. | (एक) इयत्ता पहिली ते पाचवीसाठी कामाचे दोनशे दिवस ;<br>(दोन) इयत्ता सहावी ते आठवीसाठी कामाचे दोनशे वीस दिवस ;<br>(तीन) इयत्ता पहिली ते पाचवीसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात अध्यापनाचे आठशे तास ;<br>(चार) इयत्ता सहावी ते आठवीसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात अध्यापनाचे एक हजार तास ; |
| ४ | शिक्षकासाठी प्रत्येक आठवड्याला कामाचे किमान तास. | पाठाची तयारी करण्यासह अध्यापनाचे पंचेचाळीस तास. |
| ५ | अध्यापन अध्ययन सामग्री | प्रत्येक इयत्तेच्या गरजेनुसार पुरविण्यात येईल. |
| ६ | ग्रंथालय | प्रत्येक शाळेमध्ये, वर्तमानपत्र, मासिके व गोष्टींच्या पुस्तकांसह सर्व विषयांवरील पुस्तके पुरविणारे एक ग्रंथालय असेल. |
| ७ | खेळण्याचे साहित्य, खेळ व क्रीडाविषयक सामग्री. | प्रत्येक इयत्तेच्या गरजेनुसार पुरविण्यात येईल. |